Pune Police

प्रेस नोट. दिनांक : – ३०/११/२०१८

## पुणे रेल्वे स्टेशन, येथे पोलीस निरीक्षकांवर गोळीबार करून पळुन जाणाऱ्या सराईत गुन्हेगारास अतुलनीय शौर्य व धाडस दाखवुन जिवाची पर्वा न करता पकडलेल्या पोलीसांचा सत्कार समारंभ आयोजित केले बाबत.

दिनांक २१/११/२०१८ रोजी दोन संशईत इसमांनी चंदननगर येथे महिला नामे एकता ब्रिजेश भाटी हिचा खुन करून दिल्ली येथे पळुन जाणेकरीता पुणे रेल्वे स्टेशन येथे १६.४५ वा सुमारास आले असता त्यांचा शोध घेत गुन्हे शाखा, पुणे शहर येथील पोलीस निरीक्षक गजानन पवार व त्यांचे कर्मचारी संशईत दोन आरोपींचा पुणे रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नं. ०३ वर शोध घेत असताना, प्लॅटफॉर्म नं. ०३ वर उभी असलेली झेलम एक्सप्रेस गाडीचे मागील बोगी जवळ दोन संशईत आरोपींपैकी एकाने पोलीस निरीक्षक गजानन पवार साहेब यांचेवर अग्निशस्त्राने तीन राऊंड फायर करून जुन्या ओव्हर ब्रिजवरून पळुन गेले. त्यावेळी पुणे लोहमार्ग जिल्हयातील पुणे लो.पो.ठाणे येथे नेमणूकीस असलेले पोशि प्रविण वाडेकर पोशि/२११, याने त्याचा पाठलाग केला. त्याचे मागे लोहमार्ग पोलीस दलातील पोना टेकवडे, पोशि सावंत व पुणे शहर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पाठलाग केला. सदरचा आरोपी भुयारातुन बाहेर पडुन हातातील रिव्हॉल्व्हरने रिक्षा चालकास धाक दाखवुन रिक्षात बसुन मालधक्का चौकाचे दिशेने गेला. मालधक्का चौकातील सिग्नलजवळ उतरला. तो रिक्षातुन उतरुन रस्ता ओलांडुन पळत असताना पोशि वाडेकर याने आपले अतुलनीय शौर्य व धाडस दाखवुन जिवाची पर्वा न करता, हत्यारबंद आरोपीने त्याचेवर रिव्हॉल्वर ने गोळी झाडली असतानाही, त्याचे हातातील रिव्हॉल्व्हर टाकुन द्यावा तसेच त्या रिव्हॉल्वरने सामान्य नागरिकांवर गोळी झाडु नये म्हणुन त्याने रस्त्याचे कडेला पडलेला दगड त्याचे हातावर मारला, तो दगड त्याचे पाठीवर लागला. तरी देखील तो पळत होता व त्याला पुढे नरपतगिरी चौकाकडुन येणारे रोडवर मोहम्मद पैगंबर जयंती निमित्त मुस्लिम समाजाकडुन काढण्यात आलेल्या मिरवणुकीत त्याला रिव्हॉल्व्हरसह पकडले.

अतुलनीय शौर्य व धाडस दाखवुन स्वतःच्या जिवाची पर्वा न करता, हत्यारबंद आरोपीस रिव्हॉल्व्हरसह पकडणारे पुणे लोहमार्ग जिल्हयातील कर्मचारी यांचा आज दिनांक ३०/११/२०१८ रोजी ११.३० वा. लोहमार्ग मुख्यालय खडकी येथे सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्या अनुषंगाने पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथील नेमणूकीस असलेले १) पोशि प्रविण वाडेकर पोशि/२११, २) पोना/८०३ युवराज टेकवडे , ३) पोशि/६७० सचिन सावंत यांचा सत्कार श्री. दिपक साकोरे, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांचे हस्ते पोशि प्रविण वाडेकर, पोना युवराज टेकवडे व सचिन सावंत यांना प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमास श्री. तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक, श्री. नंदकुमार घोरपडे, उप विभागीय पोलीस अधिकारी, लोह. पुणे, व श्री. नंदकिशोर भोसले–पाटील, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.) व अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.





